सत्र खटला क्र.९५/२०२५.
सरकार –वि– मोहसिन + 1
निशाणी क्र. २६.

सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. <u>०९</u> यांची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | |
|---|---|
| माझे नांव | – रमेश पांडूरंग कानडजे |
| वय | – ५८ वर्षे. |
| व्यवसाय | – सेवानिवृत्त एएसआय |
| राहणार | –रा. बुलडाणा ता. जि. बुलडाणा. |

<u>सरतपास सरकारी वकील श्री.भटकर यांचे मार्फत</u>–

०१. दि.२५.०५.२०२४ रोजी मी पो.उपनिरीक्षक म्हणुन पो.स्टे. बुलडाणा शहर येथे कार्यरत होतो. त्याच दिवशी मला अपराध क्र.४०५/२०२४ चा तपास सुपुर्द झाला. सबब, मी दोन पंचांना बोलावून त्यांचे समक्ष घटनास्थळ पंचनामा निशाणी १७ तयार केला. घटनास्थळ हा जयस्वाल चौक ते कोर्ट चौक येथे स्थित आहे. तो पंचनामा मला दाखविण्यांत आला. त्यावर माझी तसेच दोन पंचाच्या सहया आहेत. त्यातील मजकूर खरा असून बरोबत आहे. नंतर मी साक्षीदारांचे बयाण त्यांनी सांगितल्याप्रमाणे लिहले. फिर्यादी सुभाष खरात यांचा बयाण मी नोंदविला होता. त्यांनी बयाण देतेवेळेस अधोरखांकीत भाग–अ सांगितला होता. तो **नि.क्र.२७** वर आहे. तसेच, मी साक्षीदार शांतीलाल बेंडवाल यांचा बयाण नोंदविला होता. त्यांनी बयाण देतेवेळेस अधोरखांकीत भाग – अ सांगितला होता. तो **नि.क्र.२८** वर आहे. मी साक्षीदार शे. अन्वर शे. रफीक यांचा सुध्दा बयाण नोंदविला होता. त्यांनी बयाण देतेवेळेस अधोरखांकीत भाग – अ सांगितला होता. तो **नि.क्र.२९** वर आहे. तसेच, मी साक्षीदार शिवलाल बेंडवाल यांचा बयाण मी नोंदविला होता. त्यांनी बयाण देतेवेळेस अधोरखांकीत भाग – अ सांगितला होता. तो **नि.क्र.३०** वर आहे. त्याचप्रमाणे मी साक्षीदार शे. जाकीर शे.लाल यांचा बयाण नोंदविला होता. त्यांनी बयाण देतेवेळेस अधोरखांकीत भाग – अ सांगितला होता. तो **नि.क्र.३१** वर आहे. मी साक्षीदार मंगल बबन इंगळे यांचा बयाण नोंदविला होता. त्यांनी बयाण देतेवेळेस अधोरखांकीत भाग – अ सांगितला होता. तो **नि.क्र.३२** वर आहे. फिर्यादी नगर परिषद, बुलडाणा, येथे नेमणुकीस असल्याने त्यांच्या नियुक्ती आदेशाची प्रत, हजेरीची प्रत व ओळखपत्राची सत्यप्रत मिळण्यासाठी मुख्याधिकारी, नगर परिषद, बुलडाणा, यांना पत्र दिले होते. तो पत्र मला आता दाखविण्यात आले. त्यावर माझी सही

आहे. तो **नि.क्र.३३** वर आहे. या पत्राचे अनुषंगाने त्यांनी जबाब देवून तशी कागदपत्रे दिली होती. त्यांचा जबाब आता मला दाखविण्यात आला. (आरोपीचे वकीलांची हरकत नसल्याने सदर दस्तास निशाणी देण्यांत आली.). हा तोच जबाब आहे. तो **नि.क्र.३४** वर आहे. त्याचप्रमाणे प्राप्त दस्त पान क्र.२७ ते ३० आता मला दाखविण्यात आले. (आरोपीचे वकीलांची हरकत नसल्याने सदर दस्तास निशाणी देण्यांत आली.). ते दस्त एकत्रीतरित्या **नि.क्र.३५** वर आहे. तपासामध्ये आरोपींना समजपत्र देवून न्यायालयात हजर राहण्याकरीता सांगितले होते. तो समजपत्र मला दाखविण्यांत आला. त्यावर माझी सही आहे. तो **नि.क्र.३६** वर आहे. तपासाअंती त्यांच्याविरुध्द सबळ पुरावा मिळून आल्याने, सदर दोषारोपपत्र दाखल केले. ते आज न्यायालयात हजर आहेत.

उलटतपास आरोपीतर्फे श्री. राज शेख वकील यांच्या मार्फत

०२. हे मला माहित नाही की, घटनास्थळावर सिसिटीव्ही सुध्दा लावलेले होते. हे खरे आहे की, घटनास्थळ हे सतत रहदारीचा रस्ता आहे. हे खरे आहे की, मी नगर परिषद, बुलडाणा, येथील कर्मचा–यां व्यतिरीक्त इतर स्वतंत्र साक्षीदारांचे जबाब नोंदविले नाहीत. त्याचप्रमाणे मी तेव्हाचे मुख्याधिकारी यांचे पोलीस बयाण नोंदविले नाही. हे खरे नाही की, तथाकथीत घटनेचे दिवशी सार्वजनिक सुटी असल्याने फिर्यादी कर्तव्यावर हजर नव्हता. हे खरे नाही की, मी साक्षीदारांचे बयाण त्यांनी सांगितल्याप्रमाणे नोंदविले नाही. हे खरे नाही की, तपासा दरम्यान आरोपी विरुध्द गुन्हा निष्पन्न झाला नाही. हे खरे नाही की, मी वरिष्ठांच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण. फेरतपास काही नाही.

वा.दा.ब. अ.क.क.

ASHOK GURUDASMAL SANTANI
Digitally signed by ASHOK GURUDASMAL SANTANI
Date: 2026.03.23 15:21:13 +0530

(ए. जी. संतानी)
जिल्हा न्यायाधीश क्र. २
बुलडाणा

समक्ष

ASHOK GURUDASMAL SANTANI
Digitally signed by ASHOK GURUDASMAL SANTANI
Date: 2026.03.23 15:21:19 +0530

(ए. जी. संतानी)
जिल्हा न्यायाधीश क्र. २
बुलडाणा

दिनांक : २३/०३/२०२६.